बळ देत असतात. अगतिकतेच्या पलीकडे झेपावण्याचे. उषःकालापूर्वी घनदाट अंधःकार जरूर असतो. पण प्रभातकाल सन्निध असल्याची चाहूल तसे अंधार देत असतो. युवा तो, जो जगातले अंधारलेले कोपरे उजळवतो त्याचबरोबर आपल्या हृदयातला कोपराही दीप्तिमान करतो. परिस्थितीने लगाम खेचून जो तिला काबूत आणतो तो युवा.

पण साहसालाही एक अट असते. लक्ष्मणरेषा आखण्याची. तरूणाईने आपल्या जीवनात ही लक्ष्मणरेषा आखून घेतली नाही म्हणून ही शक्ती विध्वंसनात, उलथापालथीत कामी येत आहे. आपल्या युवाशक्तीला त्यांनी योग्य रस्त्यावर हाकारले नाही. कधी छोट्या-छोट्या प्रकल्पात, कार्यक्रमात इवल्याशा क्रांतीत ती तो उधळून टाकतो.

वरील उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(1) युवा कोणाला म्हणावे ? १

(2) युवा कोणती क्रांती घडवून आणतो ? १

(3) युवा कोणत्या चिंतनात मग्न असतो ? १

(4) युवा कोणत्या ध्येयाशी एकनिष्ठ असतो ? १

(5) वरील उताऱ्यास समर्पक शीर्षक सुचवा. १

**किंवा**

उपरोक्त उताऱ्याचा सारांश लिहा. ५





B. P. A. (Part – III) Examination

Compulsory Language – II

# MARATHI

P. Pages : 4

वेळ : तीन तास ] [ एकूण गुण : ७०

---

१. विद्यापीठीय शिक्षण या पाठाच्या आधारे डॉ. किनी यांच्या विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

राष्ट्राचे उत्पन्न कसे वाढवावे यावर पंढरीनाथ पाटील यांच्या विचारांचा मागोवा तुमच्या शब्दांत घ्या. १२

२. 'विदर्भ' या नावाच्या उत्पत्तीबद्दल लेखकाने कोणते विचार व्यक्त केले आहेत ?

**किंवा**

'लहानपणापासून या देशात एक विचित्र संस्कार केला जातो' असे लेखक प्रा. श्याम मानव का म्हणतात ? ८

३. 'म्हातारपणाचे फायदे' या श्री. कृ. कोल्हटकरांच्या पाठातील विनोद उकलून दाखवा.

किंवा

'बन्सीधर! तू आता कुठे रे जाशील ?' असे लेखक कां म्हणतात ? १२

४. सांप्रत कुटुंब व्यवस्थेचे खरेखुरे चित्रण 'घर' या पाठात कसे आले आहे - ते स्पष्ट करा.

किंवा

'प्रेम' या पाठाच्या आधारे लेखकाने कुलू खोऱ्याचे वर्णन कसे केले आहे ते सांगा. ८

५. उत्तम पुरुषांची लक्षणे कोणती ती विस्ताराने सांगा.

किंवा

अनंत फंदी यांनी फटक्यातून कोणते विचार मांडले आहेत ते स्पष्ट करा. १२

६. 'केवढें ओझें हें!' असे मुक्तिबोध यांनी का म्हटलेले आहे ?

किंवा

'रंग माझा वेगळा' या कवितेचा आशय थोडक्यात सांगा. ८

७. (अ) बातमी म्हणजे काय ? ते सांगून बातमी लिहितांना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात ?



किंवा

जाहिरातीच्या विविध माध्यमांचा परिचय करून द्या. ५

(ब) खालील अपठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा :-

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधत असतो तेंव्हा मला जाणवते युवा सागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही. या ढगांना आपल्या लपलेल्या विद्युत-लहरींचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण-मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्ण सुध्दा याच वयाचा होता. याहूनही लहान होता. ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे तो युवा!

दररोज मी स्वतःला बघत असतो, शोधीत असतो. कधी-कधी मी एकाकी असतो. जखम दिसत नाही पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वतःविरूध्द माझ्याजवळच तक्रार करीत असतो. युवा तो असतो जो इतरांविरूध्द नव्हे तर स्वतःविरूध्द स्वतःजवळच तक्रार मांडीत असतो. मी ते दुःख पाहिले. माझ्याजवळ इतकी शक्ती होती. मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करूणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरे गेलो नाही ? ही अस्पृश्यता, विषमता, दारिद्र्य, अज्ञान, लाचारी मी सहन करू शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणांकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो लाचारीने शरमिंदा होतो तो युवा. आपल्या या लाचारीवर तो एकांतात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला